**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांची साक्ष.**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**नाव – गौरी राहुल सहारे,**
**वय – २९ वर्ष,**
**धंदा – घरकाम,**
**पत्ता – वाकोडी, ता. सावनेर, जि. नागपूर.**

**सरतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए.एस.बिहाऊत यांचेतर्फे.**

०१) आरोपी क्र.०१ माझे पती आहे, आरोपी क्र.०२ पंचफुला माझी सासु आहे, आरोपी क्र.०३ सचिन माझे दिर आहे, आरोपी क्र.०४ व ०५ नरेश कोलते व शुभांगी कोलते हे अनुक्रमे माझे नंदोयी व नणंद आहे.

०२) माझे लग्न आरोपी क्र.०१ सोबत दिनांक १७/०५/२०२० रोजी वाकोडी येथे झाले होते. लग्नानंतर आरोपी क्र.०१ यांचे घरी अमरावती येथे नांदण्याकरिता गेली. त्यावेळी त्यांचे घरी माझी सासु, सासरे, दिर, मी, माझे पती, मामेसासऱ्यांची ०२ मुलं, सासऱ्यांच्या भावाचा ०१ मुलगा व सासुची मावशी असे आमच्यासोबत राहत होते.

०३) सर्व आरोपींनी आम्हाला लग्न जुळायच्या आधी माझे वडील व परिवाराला सांगितले होते की, राहुल सहारे यांना टाटा फायनान्स लिमीटेड, अमरावती येथे मॅनेजर म्हणून जॉब आहे व त्यांना रुपये ४५,०००/– पेमेंट आहे असे सांगितले होते. त्यांच्या सांगण्यावर विश्वास ठेवून लग्नाचा कार्यक्रम पार पडला. मी अमरावती येथे लग्नानंतर गेले असता दुसऱ्या दिवशी आरोपी क्र.०१ यांनी मला थापडा–बुक्क्यांनी मारहाण करुन माझ्याकडून रुपये ०२,०००/– घेवून गेले. माझे वडिलांनी माझ्या लग्नामध्ये मला वाहिलेले दागिने जसे की, कानातले व मंगळसुत्र असे सव्वा तिन तोळे सोने, दागिने काही दिवसांनी आरोपींनी माझ्याकडून काढून घेतले. आरोपी क्र.०१ रोज रात्री दारु पिऊन यायचे व मला शारिरिक व मानसिक त्रास देवून मारहाण करायचे व मला जेवण देखील देत नव्हते. “माहेरुन १०,००,०००/– घेवून ये तरच तुला येथे राहु देवू”

असे सर्वजण म्हणत होते.

**०४)** माझ्या वडिलांनी आरोपी क्र.०१ ची माहिती काढली असता त्यांना कंपनीतून रुपये ०९,०००/– पेमेंट मिळत होते, त्याला तेथुनही काढले होते अशी माहिती मिळाली व त्यांनी माझी फसवणूक केली. दिनांक २०/०९/२०२० रोजी माझे दिर व माझे पती यांनी मला माझ्या वडिलांच्या घरी आणून दिले. माझ्या वडिलांकडून आरोपी क्र.०१ चा भाऊ सचिन याला नोकरी लावण्याकरिता रुपये ०२,००,०००/– उसने म्हणून घेवून गेले. दिनांक २७/१०/२०२० रोजी माझी सासु, नणंद, नंदोयी व पती माझे वडिलांच्या घरी वाकोडी येथे आले होते. तिथे सुध्दा आरोपींनी थापड–बुक्क्यांनी मारहाण करुन मला व माझ्या परिवाराला जिवे मारण्याची धमकी देवून निघून गेले. त्यानंतर मी खापा पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला. त्यांनी मला नागपूर येथे भरोसा सेल येथे पाठवले. तिथे तडजोड झाली नाही. त्यानंतर मी खापा पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला. आता मला मी दिलेला **तोंडी रिपोर्ट** दाखविण्यात आला. तो हाच आहे, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी क्र.३८</u>** देण्यात येतो. त्यानुसार प्रथम खबरी अहवालाची नोंद करण्यात आली. आता मला **प्रथम खबरी अहवाल** दाखविण्यात आला. तो हाच आहे, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी क्र.३९</u>** देण्यात येतो. घटनेसंदर्भात पोलीसांनी माझी चौकशी करुन माझे बयाण नोंदविले होते. मी आरोपींना ओळखते. सासु व दिर गैरहजर आहे, इतर आरोपी हजर आहे.

<u>सरतपास पुर्ण.</u>

<u>उलटतपास आरोपींतर्फे वकील श्रीमती यु. आर. पवार यांचेमार्फत.</u>

**०५)** माधुरी दुरबडे यांनी माझे आई–वडिलांना आरोपी क्र.०१ यांचे स्थळ माझ्या लग्नाकरिता सुचवले होते. माधुरी दुरबडे या माझ्या बहिणीच्या मामेसासु आहे. हे म्हणणे **खरे आहे** की, आरोपी क्र.०१ चे स्थळ मला सुचवले त्यावेळी कोरोना कालावधी होता. त्यावेळी माधुरी दुरबडे यांनी आरोपी क्र.०१ हा बॅंकेत नोकरीस आहे व त्याबद्दल सर्व चांगले सांगितले होते. आरोपीचे स्वतःचे घर कुठे आहे हे देखील सांगितले होते.

**०६)** माझे वडील व भाऊजी आरोपींच्या घराची पाहणी–देखणी करण्याकरिता

आरोपींचे रविवारी बोलविण्यावरुन गेले होते. हे म्हणणे **खरे आहे** की, त्यावेळी आरोपींचे घरची सर्वसाधारणपणे परिस्थिती चांगली होती असे दिसून आले होते. हे म्हणणे **खरे आहे** की, माझे वडिलांची आर्थिक परिस्थिती देखील सर्वसाधारणपणे चांगली आहे. हे म्हणणे **खरे नाही** की, आमच्या लग्नाच्या वेळी आरोपींनी देण्या–घेण्याची मागणी केली नव्हती. हे म्हणणे **खरे आहे** की, मी पोलीस स्टेशनला रिपोर्ट देताना व बयाण देताना पोलीसांनी त्यामध्ये, 'आरोपींनी आमच्या लग्नाच्या वेळी देण्या–घेण्याची मागणी केली होती' ही बाब सांगितली होती परंतु ती तोंडी रिपोर्ट व बयाणामध्ये नमुद नाही. हे म्हणणे **खरे नाही** की, आमच्या लग्नाच्या वेळी आरोपींनी देण्या–घेण्याची मागणी केली होती हे खोटे सांगितले.

०७) आमच्या लग्नाच्या वेळी ०५ ते ०६ लोक आरोपींतर्फे अमरावतीहून आले होते व नणंद–नंदोयी व त्यांची मुले वर्धेहून आले होते. आमच्याकडचे अंदाजे ०७ ते ०८ लोक लग्नाला होते. आमचे लग्न माझ्या वडिलांच्या घरीच लॉक डाऊन असल्याने झाले. आमचे लग्न दिनांक १७/०५/२०२० रोजी झाल्यानंतर आमची वरात त्याच दिवशी अमरावतीला गेली त्यावेळी माझे माहेरुन माझेसोबत कोणीही आले नव्हते. सासरकडून जे लोक लग्नाला अमरावतीहून उपस्थित होते तेच लोक अमरावतीला वरातीसोबत गेले व नणंद–नंदोयी व त्यांची मुले वर्धेहून आले होते, ते वर्धेला निघून गेले. सासुची मावशी व मामेसासऱ्यांची ०२ मुले वरातीसोबत आमचे लग्नाला आले नव्हते. लग्नाच्या दिवशी आमची वरात अमरावती येथे संध्याकाळी ०६:०० ते ०७:०० वाजेच्या दरम्यान पोहचली.

०८) मला लग्नामध्ये स्टीलचे थोडे फार भांडे दिले होते. हे म्हणणे **खरे आहे** की, लग्नाच्या दुसऱ्या दिवशी कथेचा कार्यक्रम होता, त्यावेळी तिथे अंदाजे १० ते २० लोक हजर होते. दिनांक २०/०९/२०२० रोजी ज्यावेळी आरोपीने मला माझ्या माहेरी आणून दिले त्यानंतर दिनांक १९/१०/२०२० रोजी माझे वडील अमरावतीला गेले व त्यांनी चौकशी केली तेव्हा माहित पडले की, आरोपी क्र.०१ ला टाटा कॅपीटल हाऊसिंग फायनान्स कंपनीमध्ये नोकरी नाही. आरोपी क्र.०१ आधी टाटा कॅपीटल हाऊसिंग फायनान्स कंपनीमध्ये कामाला होते त्यावेळी त्यांना रुपये १२,०००/– पगार होता परंतु ते नोकरी बरोबर करीत नव्हते त्यामुळे त्यांना रुपये

०९,०००/– पगार मिळत होता परंतु ते तिथुनही सुटले होते अशी माहिती मिळाली. परंतु, त्यासंबंधी त्यासंदर्भात कुठलाही दस्त मी स्वतःहून अभिलेखावर दाखल केला नाही.

०९) दिनांक २०/०९/२०२० पर्यंत मी सासरी अमरावतीला होती त्यावेळी माझे पती सकाळी ऑफीसला जातो असे सांगायचे व रात्री ०१:०० ते ०१:३० व कधी कधी त्याहूनही उशीरा दारु पिऊन घरी यायचे. मी आरोपी क्र.०१ ला डबा बनवून देत होती परंतु ते कधी डबा न्यायचे व कधी नेत नव्हते. माधुरी दुरबडे यांनी आम्हाला आरोपींबाबत सांगितलेली माहिती आम्ही पडताळणी करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यावेळी लॉक डाऊन लागले व आरोपींनी आम्हाला विश्वास दिला त्यावर आम्ही विश्वास ठेवला. हे म्हणणे **खरे नाही** की, आरोपी क्र.०१ ला मी डबा बनवून द्यायची त्यावेळी त्यांना नोकरी नाही अशी मला कधीही शंका वाटली नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, मला कधी कधी शंका वाटत होती कारण ते कधी डबा न्यायचे कधी नेत नव्हते.

१०) हे म्हणणे **खरे आहे** की, मला सर्व आरोपी मारहाण करत होते ही बाब तोंडी रिपोर्ट व माझ्या सरतपासामध्ये सांगितली आहे. हे म्हणणे **खरे नाही** की, माझे नणंद–नंदोयी वर्धेला राहत असल्याने व लॉक डाऊन असल्याने ते माझे सासरी कधीही आले नाही. हे म्हणणे **खरे नाही** की, आरोपी क्र.०४ व ०५ हे लॉक डाऊन असल्याने अमरावतीला सासरी कधीही आले नाही, त्यांना खोट्या केसमध्ये गोवण्याकरिता रिपोर्टमध्ये त्यांची नावे टाकली. हे म्हणणे **खरे आहे** की, माझी नणंद वर्धेला नगरसेविका आहे. हे म्हणणे **खरे नाही** की, कोरोना कालावधीमध्ये शासकीय–निमशासकीय अधिकाऱ्यांना बऱ्याचशा शासकीय जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्याने त्यांना बाहेर येणे–जाण्याची परवानगी नव्हती.

११) हे म्हणणे **खरे नाही** की, सोन्याचे मंगळसुत्र अडीच तोळे व कानातले सव्वापाच ग्राम आरोपींनी काढून घेतले हे खोटे सांगितले. सोन्याचे मंगळसुत्र व सोन्याचे कानातले यांचे बिल मी अभिलेखावर दाखल केले नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, त्याचे बिलं माझ्याकडे आहे. माझे सासरी मेस होती व मेसचे सर्व जेवण बनविने हे काम माझ्याकडेच होते. २५ ते ३० डबे, घरचे लोकांचे व कधी कधी जास्त लोकांचे जेवणाचे डबे बनविण्याची पुर्ण जबाबदारी माझी होती व

भांडे देखील मी घासत होती. डबे बनविण्याकरिता भाजीपाला व राशन सासु–सासरे व दिर आणून द्यायचे. मी सासरी गेल्यानंतर लॉक डाऊन असल्याने लोकांचे डबे जायचे परंतु आरोपींनी आम्हाला आधी सांगितले होते की, लोक घरीच मेसमध्ये जेवण करण्याकरिता येत होते. हे म्हणणे **खरे आहे** की, आरोपींच्या घरी मेस आहे हे मला लग्नापुर्वीच माहित होते. हे म्हणणे **खरे आहे** की, मेस व घरच्या कामांमुळे माझ्यावर घरच्या कामांचा बराच भार पडत होता.

१२) ३० ते ३५ लोकांना भाजी करण्याकरिता किती किलो भाजी लागते हे मला माहित आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, अंदाजे ०५ ते ०६ किलो भाजी लागते. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, माझी सासु मला एकदम पुर्ण स्वयंपाक कधीही करु द्यायची नाही, जसे लोक जेवायला बसतील तशाचप्रमाणे स्वयंपाक करण्यास सांगत होती व "जेवण बिलकुल वाया नाही गेले पाहिजे"" असे सांगत होती व "सतत तु स्वयंपाकच करत रहा" असे म्हणत होती. हे म्हणणे **खरे नाही** की, मेसचे वाढीव काम करण्याचे माझ्या जिवावर येत होते व मला सासरी रहायचेच नव्हते म्हणून मी खोटी केस केली आहे व आरोपींना फसविण्याचा प्रयत्न केला आहे. हे म्हणणे **खरे नाही** की, मला सासरी कोणत्याही प्रकारचा मानसिक व शारिरिक त्रास झाला नाही.

१३) हे म्हणणे **खरे नाही** की, दिनांक २७/१०/२०२० रोजी आरोपींनी माझे माहेरी येवून मला मारहाण केली हे खोटे सांगत आहे. हे म्हणणे **खरे नाही** की, मी माझ्या पतीला फक्त रुपये ४५,०००/– पगार आहे हे गृहीत धरुन सासरी नांदण्याकरिता गेली होती. हे म्हणणे **खरे नाही** की, कोरोना काळ असल्यामुळे बऱ्याचशा लोकांच्या नोकऱ्या गेल्या होत्या. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, आम्हाला माहिती मिळाली होती की, आरोपी क्र.०१ दोन वर्षांच्या बॉडवर टाटा कॅपीटल फायनान्स येथे नोकरीस लागला होता हे आम्हाला सांगितले नाही. हे म्हणणे **खरे नाही** की, आरोपी क्र.०१ ने मला लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी थापड–बुक्क्यांनी मारहाण केली हे खोटे सांगितले. हे म्हणणे **खरे नाही** की, सासु, दिर, नणंद–नंदोयी यांनी मला शिवीगाळ केली, शारिरिक व मानसिक त्रास दिला हे खोटे सांगितले. हे म्हणणे **खरे नाही** की, मी आरोपींविरुध्द केलेल्या ०२ ते ०४ केसेस आरोपींना फसविण्याकरिताच दाखल केल्या आहे.

१४) हे म्हणणे **खरे आहे** की, नागपूर येथील कौटुंबीक न्यायालयमध्ये आरोपी क्र.०१

यांचेपासून घटस्फोट मिळण्याकरिता प्रकरण दाखल केले आहे. हे म्हणणे **खरे नाही** की, माझे वडिलांची परिस्थिती सर्वसाधारण असल्याने व कोरोना कालावधी असल्याने त्यांच्याकडे आरोपी क्र.०१ चे भाऊ यांना धंदा करण्याकरिता रुपये ०२,००,०००/– नव्हते. हे म्हणणे **खरे नाही** की, माझे वडिलांनी आरोपी क्र.०१ चे भावाला धंदा करण्याकरिता रुपये ०२,००,०००/– दिले हे खोटे सांगितले. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, माझ्या वडिलांनी त्यांचा मित्र नामे शेषराव रहाटे यांच्याकडून रुपये ०२,००,०००/– घेवून आरोपी क्र.०१ ला दिले होते. हे म्हणणे **खरे नाही** की, आरोपींनी मला माझ्या माहेरुन रुपये १०,००,०००/– आणण्याची मागणी केली होती ही मनघडन कहानी सांगत आहे कारण माझे माहेर व सासरची परिस्थिती सर्वसाधारण आहे त्यामुळे रुपये १०,००,०००/– ची मागणी ही मनघडन आहे. हे म्हणणे **खरे नाही** की, कोणत्याही प्रकारे पैशांची देवाण–घेवाण झाली नाही. हे म्हणणे **खरे नाही** की, आरोपींना फसविण्याकरिता सदर बाब सांगत आहे.

**१५)** मी भरोसा सेल, नागपूर येथे गेली होती. आरोपींविरुध्द मी पहिली रिपोर्ट दिनांक २७/१०/२०२० रोजी व दुसरी रिपोर्ट जानेवारी २०२१ मध्ये दिली. हे म्हणणे **खरे नाही** की, मला सासरी कामाचा भार सहन होत नव्हता, मला तिथे नांदायचे नव्हते त्यामुळे मी कुठलेतरी कारण काढून आरोपींना फसविण्याकरिता ही केस दाखल केली व हे म्हणणे **खरे नाही** की, आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

**वा.दा.का.दा.** **श्रवणोत्तर स्वीकृत**

**समक्ष**

स्वा./– स्वा./–

**(प्रियंका पी. नातू)** **(प्रियंका पी. नातू)**

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,** **न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**

**न्यायालय क्र.०३, सावनेर, जि. नागपूर.** **न्यायालय क्र.०३, सावनेर, जि. नागपूर.**

दिनांक ०६/०५/२०२३

<u>निशाणी क्र. ३७.</u>

## प्रमाणपत्र

मी खात्रीपूर्वक असे कथीत करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील साक्षपुरावा हे मुळ साक्षपुराव्या प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – महेश ल. इंगळे.